'हिंद-दी-चादर' गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

हिंद-दी-चादर समागम कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी भाविकांची अलोट गर्दी >> पान 3

शहराची हद्दवाढ लवकरच; उच्च न्यायालयाचे राज्य शासनाला चार महिन्यांत निर्णयाचे आदेश >> पान 4

**सुविचार**

ज्याने वेळ वाया घालविला त्याच्याजवळ गमवायला काहीच शिल्लक राहत नाही.- अज्ञात

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 168 ■ सोमवार, दि. 26 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# राज्यातील १५ जणांना पद्म पुरस्कार

## धर्मेंद्र , भिकल्या धिंडा, रोहित शर्मा, जुझेर वासी यांचा समावेश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी महत्त्वपूर्ण अशा पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील १५ जणांचा गौरव करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील एकाला 'पद्मविभूषण' तीन पद्मभूषण आणि ११ जणांना पद्मश्री पुरस्कार मिळाले आहेत.

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र सिंह देओल यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण' पुरस्कार जाहीर झाला. पद्मभूषण श्रेणीमध्ये राज्यातील तीन मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. यात प्रसिद्ध पार्श्र्वगायिका अलका याज्ञिक (कला), जाहिरात क्षेत्रातील दिग्गज पीयूष पांडे (मरणोत्तर - कला) आणि




बँकिंग क्षेत्रातील उदय कोटक (व्यापार व उद्योग) यांचा समावेश आहे.

पद्मश्री पुरस्कारांमध्ये छत्तीसगडमधील अतिदुर्गम बस्तर येथे आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे डॉ. राम गोडबोले आणि सुनीता गोडबोले या दाम्प्त्याला वैद्यकक्षेत्रातील, क्रिकेटपटू रोहित शर्मा, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी आर्मिडा फर्नांडिस, समाजसेवेसाठी जनार्दन बापूराव बोथे आणि कृषी क्षेत्रासाठी श्रीरंग देवाबा लाड यांचा समावेश आहे. कला क्षेत्रातून भिकल्या लाडक्या धिंडा, माधवन रंगनाथन, रघुवीर तुकाराम खेडकर आणि सतीश शाह (मरणोत्तर) यांना हा सन्मान जाहीर झाला. व्यापार व उद्योग क्षेत्रातून अशोक खाडे व सत्यनारायण नुवाल आणि विज्ञान व अभियांत्रिकी क्षेत्रातून जुझेर वासी यांना हा सन्मान जाहीर झाला.

केंद्र सरकारने १३१ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यामध्ये पाच पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. केरळचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते व्ही. एस. अच्युतानंदन यांना मरणोत्तर पद्मविभूषण हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर करण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश के. टी. थॉमस, कला क्षेत्रात ज्येष्ठ व्हायोलिनवादक एन. राजम, तर साहित्य व शिक्षण क्षेत्रात मल्याळम पत्रकार पी. नारायणन यांना पद्मविभूषण प्रदान करण्यात आला आहे. उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंह कोश्यारी, ज्येष्ठ अभिनेते ममूटी यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक शिबू सोरेन आणि भाजप नेते व्ही. के. मल्होत्रा यांनाही मरणोत्तर पद्मभूषण जाहीर झाला आहे. यंदाच्या पद्म पुरस्कार यादीत ९० महिला असून, परदेशी नागरिक, अनिवासी भारतीय, भारतीय वंशाचे परदेशी नागरिक आणि भारतीय नागरिकत्व असलेले परदेशस्थित या प्रवर्गातील सहा व्यक्तींचा समावेश आहे. टेनिसपटू विजय अमृतराज यांना पद्मभूषण, महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि हॉकीपटू सविता पुनिया यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला. याशिवाय, माजी जेएनयू कुलगुरू एम. जगदीश कुमार, प्रसार भारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी शशी शेखर वेमपाटी, प्रोसेनजित चॅटर्जी यांचाही पद्मश्री पुरस्कारार्थींमध्ये समावेश आहे.

## संगमेश्वर मुरादपूर येथे ३ लाख ६० हजार किमतीच्या खैर चोरीला; देवरुख पोलिसांत गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** देवरुखजवळील मुरादपूर गावात सुमारे ३ लाख ६० हजार रुपये किमतीच्या खैराच्या झाडांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी जमीन मालक बळीराम सीताराम चौगले यांनी देवरुख पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे या चोरीप्रकरणी त्यांनी आपल्या चुलत भावावर संशय व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी नऊच्या सुमारास बळीराम चौगले यांना त्यांच्या मालकीच्या (सर्वे नं. ८२/९) जमिनीतून झाडे तोडण्याचा आवाज ऐकू आला. यावेळी पुतण्यासह ते घटनास्थळी गेले असता, तेथे दहा कामगार खैराची झाडे तोडताना दिसले. चौकशी केली असता, परशुराम चौगले यांनी झाडे तोडण्यास सांगितले असल्याचे कामगारांनी सांगितले.

झाडतोड थांबवण्याची सूचना केल्यानंतर परशुराम चौगले यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. त्यावेळी संबंधित जागा आपलीच असल्याचा दावा करत, ''जागा माझी असल्यास मी झाडे तोडणारच,'' असे म्हणत, जागा दुसऱ्याची सिद्ध झाल्यास झाडांची दुप्पट किंमत देण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. हा वाद त्याच दिवशी पोलीस ठाण्यात नेण्यात आला. जागेची मोजणी करून मालकी निश्चित झाल्यानंतर झाडांबाबत निर्णय घेण्याचे तेथे ठरले होते. त्यानंतर १६ जानेवारी रोजी बळीराम चौगले यांनी भूमी अभिलेख कार्यालय, देवरुख येथे जमिनीच्या मोजणीसाठी अर्ज केला. मात्र, अर्ज प्रलंबित असतानाच २० जानेवारी रोजी ते पुन्हा संबंधित जमिनीत गेले असता, तोडलेली सर्व २० खैराची झाडे गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या प्रकारामुळे धक्क्यात सापडलेल्या बळीराम चौगले यांनी देवरुख पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ कलम ३०२(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरू आहे.

## ग्रामपंचायतींसंदर्भात राज्य सरकारचा मोठा निर्णय! परिपत्रक झालं प्रसिद्ध

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामपंचायतींच्या कार्यकाळाबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यातील अनेक ग्रामपंचायतींची मुदत संपणार असून, अशा परिस्थितीत प्रशासकीय कामकाज सुरळीत सुरू राहावे यासाठी त्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिकृत पत्रक २३ जानेवारी रोजी राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहे.

निर्णय काय?

राज्य सरकारच्या या निर्णयानुसार, ज्या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान संपणार आहे, तसेच ज्या ठिकाणी निवडणुका होऊनही नवीन ग्रामपंचायत अद्याप अस्तित्वात आलेली नाही, अशा सर्व ठिकाणी प्रशासकीय मंजुरी देण्यात येणार आहे. नवीन सदस्य निवडून येईपर्यंत आणि नियमानुसार ग्रामपंचायत कार्यरत होईपर्यंत प्रशासकमार्फत कारभार चालवला जाणार आहे.

या निर्णयामागे उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान होऊ नये, याची विशेष काळजी घेण्यात आली असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासनात कोणतीही पोकळी निर्माण होऊ नये, तसेच ग्रामीण भागातील विकासकामे, दैनंदिन प्रशासकीय कामकाज आणि नागरिकांच्या सेवा अखंडितपणे सुरू राहाव्यात, हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे.

या संदर्भातील महत्त्वाचे आदेश राज्य शासनाकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहेत. हे आदेश अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आले असून, त्यानुसार आता संबंधित जिल्ह्यांमध्ये मुदत संपलेल्या किंवा संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही सुरू केली जाणार आहे.

## न्यायाधीश नेमणुका, बदल्यांत हस्तक्षेप नको..

### सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी ठणकावले!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** 'लोकशाही हीसुद्धा राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीचाच एक भाग आहे. लोकांच्या बहुमताचा कौल हा नेहमीच न्याय्य असेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळेच बहुमत आणि राज्यघटनात्मक मूल्य यांच्यात निवड ही राज्यघटनात्मक मूल्यांचीच व्हावी,' असे मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उज्जल भुयान यांनी मांडले. 'लोकशाही टिकविण्यासाठी न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित राहणे अत्यावश्यक आहे. स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी कार्यकारी मंडळाचा न्यायाधीशांच्या नेमणुकांत आणि बदल्यांमध्ये हस्तक्षेप होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे,' असेही त्यांनी नमूद केले.

इंडियन लॉ सोसायटी आणि आयएलएस विधी महाविद्यालयातर्फे आयोजित प्राचार्य जी. व्ही. पंडित यांच्या स्मृती व्याख्यानावेळी भुयान बोलत होते. 'राज्यघटनात्मक मूल्ये आणि लोकशाही शासन' या विषयावर भुयान यांनी भाष्य केले. संस्थेच्या मानद सचिव, महाविद्यालयाच्या प्रशासकीय व्यवस्थापक वैजयंती जोशी, प्रभारी प्राचार्य डॉ. दीपा पातुरकर, मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश एन. सतीशकुमार, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्रीकांत साठे आदी या वेळी उपस्थित होते.

भुयान म्हणाले, 'राज्यघटनात्मक मूल्ये हीच लोकशाही शासनाचा आत्मा आहेत. लोकशाही शासन हे सत्ता व बळ यांवर नाही, तर स्वातंत्र्य, समता आणि न्याय यांवर आधारित हवे. लोकशाहीच्या संरक्षणासाठी राज्यघटना व राज्यघटनात्मक मूल्यांचे जतन करणे अनिवार्य आहे. लोकशाही कोण्या एका व्यक्तीचे राज्य असता कामा नये. त्यामुळेच न्यायपालिकेचे महत्त्व लोकशाहीत अनन्यसाधारण ठरते. यात न्यायालयाचे स्वातंत्र्य, न्याय मंडळाची न्यायदानामध्ये गरजेची असलेली लवचीकता, जनमानसात लोकशाही आणि राज्यघटनेप्रती आदर निर्माण करणे अत्यावश्यक ठरते. लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळे येतात-जातात. त्यामुळे न्यायालयांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असू नये. किंबहुना न्यायालयाच्या कार्यपद्धतीमध्ये कार्यकारी मंडळाचा हस्तक्षेप आणि राजकीय दबाव असूच नये.'

'केशवानंद भारती खटल्यात न्यायालयाने स्थापित केलेली राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांची चौकट ही लोकशाहीसाठी अनिवार्य आहे. या चौकटीत न्यायालयाचे स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्षता आणि न्यायिक पुनर्विलोकन इत्यादींचा समावेश होतो. न्यायाधीशांच्या नेमणुका सध्या कॉलेजियमच्या (न्यायाधीशांच्या समितीच्या) शिफारशीनुसार राष्ट्रपती करतात. या पद्धतीच्या नेमणुका म्हणजे न्यायालयाची जुलूमशाहीच असल्याचे मत व्यक्त करतात. कॉलेजियम पद्धत ही दोषमुक्त नसली, तरी उपलब्ध पर्यायांमध्ये उत्तम आणि सुरक्षित पर्याय आहे. कायदे मंडळाने निर्माण केलेला कायदा किंवा कार्यकारी मंडळाची कार्ये यांमुळे मानवी हक्क आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेला तडा जाऊ नये यासाठी सतत झटले पाहिजे. राज्यघटनेने प्रवाहाबाहेर फेकल्या गेलेल्या असंख्य व्यक्तींना मुख्य प्रवाहात परत आणण्याचे, वंचित घटकांना प्रतिनिधित्व देण्याचे, तसेच उपेक्षितांना सबळ करण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे आपल्या राज्यघटनेचे व राज्यघटनात्मक मूल्यांचे संरक्षण करण्याची नैतिक जबाबदारी सर्वांवर आहे,' असेही भुयान यांनी नमूद केले.

## तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले दर्शन

**नांदेड/प्रतिनिधी :** तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दर्शन घेतले.

त्यांच्यासह आंध्रप्रदेश उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य चरणदीप सिंघ आदींनीही दर्शन घेतले.



गुरुद्वारा बोर्डाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी, मान्यवर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांची प्रमुख उपस्थिती होती.




## ५ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

नवी दिल्ली: देशभरात हवामानाचा लहरीपणा वाढताना दिसत असून कधी कडाक्याची थंडी तर कधी अचानक पावसाचा मारा असा अनुभव नागरिकांना येत आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तासांसाठी आणखी एक महत्त्वाचा इशारा जारी केला असून देशातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसामुळे तापमानात २ ते ३ अंश सेल्सियसने घट होण्याची शक्यता असून थंडीचा जोर अधिक वाढणार असल्याचे सांगण्यात आले.

हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा

हवामान विभागानुसार पुढील ४८ तासांत हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मीर, तामिळनाडू आणि पुडुचेरी या ५ राज्यांत जोरदार पावसाचा आणि वादळी वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. २७ व २८ जानेवारी रोजी जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये मध्यम ते जोरदार पाऊस व बर्फवृष्टी, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. या भागांत गारपीटीचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच २५ जानेवारी रोजी तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल येथे काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. केरळ आणि माहे येथे २६ जानेवारी रोजी विजांसह मेघगर्जनेची



शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

उत्तर भारतात शीतलहरीचा इशारा

पुढील २४ तासांत उत्तर प्रदेशातील प्रयागराज, अयोध्या, कानपूर, रामपूर, बिजनौर, रायबरेली, आग्रा, मथुरा आणि अलीगड येथे सकाळच्या वेळी शीतलहर जाणवणार आहे. हरियाणातील गुरुग्राम आणि सोनीपत येथेही तीव्र थंडीचा इशारा देण्यात आला आहे. पंजाबमधील अमृतसर, जालंधर, बठिंडा, पटियाला, होशियारपूर आणि मोहाली येथे ताशी १० ते १५ किमी वेगाने वाऱ्यांसह शीतलहर राहण्याची शक्यता आहे.

दिल्लीतील हवामानाचा अंदाज

दिल्लीकरांसाठीही हवामान विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. २७ जानेवारी रोजी राजधानीत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. २५ जानेवारी रोजी सकाळी तापमानात आणखी घट होणार असून ताशी १० ते १५ किमी वेगाने थंड वारे वाहणार आहेत. दिल्लीचे कमाल तापमान सुमारे १७ अंश सेल्सियस तर किमान तापमान ४ अंश सेल्सियसपर्यंत घसरण्याची शक्यता आहे.

## महानगरे प्रदुषणाच्या विळख्यात !

स्वित्झर्लंडमधील दावोस हे जागतिक अर्थकारणाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. तेथील आर्थिक परिषद, गुंतवणुकीचे करार व त्यातील करोडोंचे आकडे डोळे विस्फारणारे असतात. कुणी किती गुंतवणूक खेचून आणली, लक्ष्मीची पावले कशी उमटवली वगैरे चर्चा नेमेची होते गुंतवणूक अशाच तहेची. तथापि, याच आर्थिक मंचावर जागतिक नाणेनिधीच्या माजी मुख्य अर्थतज्ञ गीता गोपीनाथ यांनी भारताला दिलेला इशारा अतिशय गंभीर म्हटला पाहिजे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेल्या आयात शुल्कापेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेला प्रदूषणच अधिक धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी म्हटले आहे. त्यातील अर्थ समजून घ्यायला हवा. मुळात गीता गोपीनाथ यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास दांडगा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या नावाला वेगळे वलय आहे. हे बघता प्रदूषणाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी आपण ठोस पावले उचलणार का, हा महत्त्वाचा मुद्दा होय. जल, वायू, ध्वनी व कचरा प्रदूषण आज सर्वच देशांसमोरील मोठे आव्हान आहे. परंतु, अनेक देशांनी प्रदूषण मर्यादित ठेवण्यामध्ये यश मिळविले आहे. तथापि, भारतासारख्या विकसनशील देशात प्रदूषणाने अक्षरशः टोक गाठले आहे. दिल्ली, मुंबई, कोलकातासारख्या शहरांनी जगातील प्रदुषित शहरांमध्ये अग्रस्थान मिळविले आहे. याशिवाय पुणे, कानपूर, लखनौसह बहुतांश महानगरे प्रदुषणाच्या विळख्यात सापडल्याचे पहायला मिळते. हिवाळ्यामध्ये दिल्लीची हवा किती विषारी बनते, याचा प्रत्यय दरवर्षी येत असतो. स्वाभाविकच आरोग्याच्या समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे इतर राज्यातील व परदेशातील नागरिक या काळात दिल्लीत येणे शक्यतो टाळतात. हे काही भूषणावह म्हणता येणार नाही. हवेसोबतच पाणी, कचरा आणि ध्वनी प्रदूषणाच्या बाबतीत देश म्हणून भारत आघाडीवर आहे. देशातील अनेक नद्या प्रदुषित झाल्या आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी व दुर्गंधींनी शहरे व्यापून गेली आहेत. वाहनांचा धूर व गोंगाटात लोकांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य हरवले आहे. त्यामुळे प्रदूषण हे भारतासमोरील प्रमुख आव्हान असून, त्याचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम कोणत्याही शुल्कापेक्षा गंभीर असतील, हा गीता गोपीनाथ यांनी दिलेला इशारा ही वस्तुस्थिती म्हटली पाहिजे. प्रदूषणाचे म्हणून अनेक परिणाम असतात. उत्पादकता, आरोग्यसेवेवरील खर्च व एकूण आर्थिक हालचालींवरही त्याचे परिणाम होतात. त्यामुळे आर्थिक वाढ मंदावण्यामागे हेही एक कारण असल्याची मांडणी त्या करतात. खरे तर खुले आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर भारताने सर्व स्तरावर मोठी प्रगती केली. मागच्या तीन ते साडेतीनदशकात भारताने साधलेली आर्थिक घोडदौड थक्क करायला लावणारी ठरते. अलीकडेच जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताने झेप घेतली आहे. ही बाब निश्चितच अभिमानास्पद म्हटली पाहिजे. परंतु, या सर्वाला प्रदुषणाची काळी किनार आहे, हे लक्षात घ्यावे. आर्थिक विस्तार व पायाभूत सुविधांच्या विकासात देश प्रगती करत असताना मोठ्या शहरांमध्ये प्रदूषण ही कायमस्वरुपी समस्या होऊन बसली आहे. भारतात दरवर्षी सुमारे १७ लाख मृत्यू हे केवळ प्रदूषणामुळे होतात. हे प्रमाण देशातील एकूण मृत्यूंपैकी १८ टक्के आहे, असे २०२२ च्या जागतिक बँकेच्या एका अहवालात म्हटले आहे. यातून प्रदूषणाचे संकट किती जीवघेणे आहे, हे दिसून येते. म्हणूनच पर्यावरणीय समस्यांचा मानवी आयुष्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे बनते. मागच्या काही वर्षांपासून प्रदूषणाच्या दाहकतेवर नियंत्रण मिळविण्यासाठी देशात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. परंतु, अद्यापपर्यंत तरी त्या तोकड्याच असल्याचे पहायला मिळते. मात्र, आगामी काळात शासन, प्रशासन व जनता अशा सर्वांच्या सहभागातून या समस्येवर मात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. प्रदूषणावर नियंत्रण नसेल, तर भारतीय अर्थव्यवस्थेचे संरक्षण करणेही कठीण होईल, असे गीता गोपीनाथ म्हणतात. ते खरेच आहे. म्हणूनच पर्यावरणाला प्राधान्य देऊन प्रदूषण नियंत्रणाचा मंत्र आपल्याला जपावा लागेल. एकीकडे प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर असताना आगामी काळात जगावर पाणीसंकटाची टांगती तलवार असल्याचा मुद्दा संयुक्त राष्ट्र विद्यापीठाच्या अहवालातून समोर आला आहे. मानवाने गोड्या पाण्याचा अनिर्बंध उपसा केला आहे. त्यामुळे त्याची भरपाई होणे जवळपास अशक्य आहे. जगातील अनेक शहरे डे झिरोच्या दिशेने जात आहेत. इराणची राजधानी तेहरानमध्ये पाण्याची कमतरता निर्माण झाल्याने हे शहर अन्यत्र हलवण्याची वेळ येऊ शकते. बेंगळूर, चेन्नई, दिल्ली यांसारखी महानगरेही डे झिरोच्या जवळ असल्याचे यात म्हटले आहे. यातील गांभीर्यही समजून घेतले पाहिजे. जगातील एक चतुर्थांश लोकसंख्या जलाशयांवर अवलंबून आहे. तर निम्मी लोकसंख्या गरजांसाठी भूजलातील पाणी वापरते. परंतु, हे पाणी वेगाने संपत आहे. त्यामुळे अब्जावधी लोकसंख्येला वर्षातील किमान महिनाभर तीव्र पाणीसंकटाचा सामना करावा लागतो. मागच्या काही वर्षांत वातावरण बदल वा ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. त्यामुळे ढगफुटी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, थंडीच्या लाटा यांसारख्या आपत्ती वाढल्या आहेत. पर्यावरणाचे व्हासचक्र असेच सुरु राहिले, तर ग्लोबल वॉर्मिंगचा धोका आणखी वाढू शकतो. परिणामी पाणीसंकटही गडद होऊ शकते. पाणी ही माणसाची मूलभूत गरज आहे. नद्या, जलाशयांकाठीच सर्व संस्कृत्या वसल्या, पोसल्या गेल्याचा इतिहास आहे. परंतु, याचा विचार न करता विकासाच्या नावाखाली माणसाने निसर्गाची जी ओरबाडणूक केली आहे, त्याचेच हे सर्व परिणाम आहेत. विकास नको, असे कुणी म्हणणार नाही. पण, त्यात तारतम्य हवे. नाशकातील तपोवनाच्या विषयात असेच तारतम्य सोडून वर्तन करण्याचा प्रयत्न झाला. पण, लोकांनी तो हाणून पाडला. हे बघता पर्यावरणावरील टॅरिफ टाळण्यासाठी भविष्यात सगळ्यांनाच संवेदनशील व सजग रहावे लागेल.

# 'हिंद-दी-चादर' गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानातून मानवी मूल्यांच्या रक्षणाची प्रेरणा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**– नांदेड येथे हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त कार्यक्रमाला लाखो भाविकांची उपस्थिती**

**– श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न**

**– श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारे नऊ समाज प्रथमच लाखोंच्या संख्येने एकत्र**

दैनिक आपला विदर्भ





**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे बलिदान मानवी मूल्यांसाठी होते. त्यांचे बलिदान आपल्याला सत्य, धर्म आणि मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी निर्भीडपणे उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच त्यांचे विचार राज्यातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, नवी दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मनजिंदर सिंघ सिरसा, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ.अजित गोपछडे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार जितेंद्र अंतापूरकर, आमदार रवींद्र चव्हाण, राज्य अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, अल्पसंख्याक विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, गुरूव्दारा बोर्डाचे प्रशासक डॉ.विजय सतबीर सिंघ, शहीदी समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरू तेग बहादुर साहिब जी यांनी दिलेले बलिदान हे केवळ शीख धर्मासाठी नव्हते, तर या देशाची संस्कृती, सभ्यता, विचारधारा आणि धर्म यांच्या रक्षणासाठी होते. त्यांचा पराक्रम, वीरता, शौर्य आणि सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने समाज नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत एकत्र आला आहे. गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या बलिदानामुळे संपूर्ण देशात धर्म, स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानासाठी लढण्याची नवी चेतना निर्माण झाली. त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा, यासाठी शहीदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांवर जावून श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शीख गुरूंचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

श्री गुरु नानक देवजींना मानणारा, त्यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारा सर्व समाज एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. देशाच्या विपरीत परिस्थितीत श्री गुरु नानक देवजींनी एकत्र बांधणारा, भेदाभेद नष्ट करणारा महान विचार दिला आहे. त्या विचारांनी संपूर्ण देशात विविध समाजांना जोडण्याचे काम केले. हा विचार घेवून सर्व समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून होत आहे. संत नामदेव महाराज हे महाराष्ट्रातील महान संत होते. त्यांची समाधी पंजाबमधील घुमान येथे आहे. संत नामदेवांनी मांडलेले विचार, त्यांचे अभंग आणि पंक्ती यांना श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये स्थान मिळाले आहे.

त्यांचे विचार गुरुबाणीचा अविभाज्य भाग बनले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील वारकरी परंपरा आणि शीख समाज यांच्यातील अनोखे, अतूट नाते अधिक दृढ झाले आहे. श्री गुरु गोविंद सिंघ महाराजांच्या दीर्घकाळ वास्तव्याने नांदेडची भूमी पावन झाली आहे. या भूमीने सामाजिक सलोखा अधिक मजबूत करण्याचे काम केले असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचे बलिदान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवी सांस्कृतिक वारशाच्या रक्षणासाठी होते.जुलमी शासकांच्या दमनकारी धोरणांविरुद्ध विचार स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले गुरु तेग बहादुर जी यांचे बलिदान हे अभूतपूर्व ऐतिहासिक उदाहरण असून,त्यांच्या निर्भय आचरणातून धार्मिक व नैतिक दृढतेचा आदर्श मिळतो,असे त्यांनी सांगितले. धर्मतत्त्वज्ञान जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी देशभर प्रवास करून आध्यात्मिक,सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी रचनात्मक कार्य केले.अंधश्रद्धा व अपप्रथांविरुद्ध त्यांनी प्रबोधन केले, तसेच विहिरी खोदणे, धर्मशाळा उभारणे, दानधर्म व प्राणीसेवा यांसारखी सार्वजनिक कल्याणाची कामे केली, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी आपल्या भाषणाला मराठी भाषेत सुरुवात करत महाराष्ट्रात पुन्हा येऊन आनंद झाल्याचे सांगितले. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या बलिदानाच्या स्मरणासाठी होणारा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरेल, असे ते म्हणाले. गुरू तेग बहादूर जी यांच्या जीवनाचा आदर्श घेत युवकांनी देशाला नव्या उंचीवर घेवून जाण्याचा, तसेच देशाला अखंडीत ठेवण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इतिहासातून सामर्थ्यासोबत सद्भाव जपण्याचा संदेश महाराष्ट्राने दिला आहे, असा उल्लेखही श्री. कल्याण यांनी केला.

दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मजिंदर सिंघ सिरसा म्हणाले, या समागम कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले, याचा आनंद आहे. अतिशय भव्य कार्यक्रमाचे आयोजन राज्य शासन व नऊ समाजाच्या सहभागातून केले आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास जगासमोर आणण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्षात आणला. नांदेडच्या ऐतिहासिक भूमीत होत असलेल्या या समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानत हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या मातीतील विविध समाजाला एकत्र आणणारा ठरल्याचे त्यांनी सांगितले.

संत ज्ञानी हरनाम सिंघ म्हणाले, संत नामदेव यांनी पंजाब आणि महाराष्ट्राला जोडण्याचे काम केले, त्यानंतर श्री गुरु गोविंद सिंघ यांनी महाराष्ट्रात येवून दोन्ही राज्यातील समाजाला जोडण्याचे काम केले. देशावर जेव्हा संकट आले, तेव्हा महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांनी शौर्य दाखविले. ज्या धार्मिक सभ्यतांसाठी श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांनी बलिदान दिले, त्या धार्मिक सभ्यता जपण्याचा, त्यांना आपल्या जीवनाचा हिस्सा बनविण्यासाठी संकल्प युवा वर्गाने करावा, असे आवाहन त्यांनी केले. शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचा इतिहास समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. तसेच शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा इतिहास घराघरात पोहचत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

श्री गुरु नानक देवजी यांच्या विचारांवर श्रद्धा असणाऱ्या नऊ समाजांना पहिल्यांदाच एकत्र आणून आयोजित केलेला हा कार्यक्रम समाजाला जोडणारा आहे.नऊ समाज श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्याशी जोडले गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात तीन ठिकाणी होणाऱ्या शहीदी समागम कार्यक्रमांच्या निमित्ताने हे समाज पुन्हा एकत्र येत आहेत.शीख समाजाचा इतिहास शाळांमध्ये शिकवला जात आहे, ही अतिशय आनंददायी बाब असल्याचे गुरूव्दारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरू ग्रंथ साहिब जी यांचे दर्शन घेतले. तसेच यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पंच प्यारे यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर बाबा कुलवंत सिंघ, बाबा हरनाम सिंघ, बाबा बलविंदर सिंघ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविक अखिल भारतीय धर्म जागरण समितीचे प्रमुख शरदराव ढोले यांनी केले. शहीदी समागम कार्यक्रमाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी आभार मानले.

# बॉर्डर २नं केला बॉक्स ऑफिसवर धमाका, सोशल मीडियावर झालं कौतुक...

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** बॉलिवूड चित्रपट बॉर्डर हा १९९७चा क्लासिक चित्रपट आहे. बॉर्डरचा सीक्वेल २३ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. सनी देओल आपल्या दमदार अभिनय आणि रोमांचक कथेसह रुपेरी पडद्यावर पडद्यावर परतला आहे. बॉर्डर २मध्ये सनी देओल मेजर कुलदीप सिंग चांदपुरीची भूमिका साकारत आहे. तसेच या चित्रपटाच्या नवीन कलाकारांमध्ये वरुण धवन (कर्नल होशियार सिंग दहिया), दिलजीत दोसांझ (निर्मल जीत सिंग सेखों), अहान शेट्टी, सोनम बाजवा, मोना सिंग आणि मेधा राणा यांचा समावेश आहे. हा चित्रपट भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. बॉर्डर २ चित्रपट देशभक्तीच्या भावनांनी भरलेला आहे. आता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई करेल अशी अपेक्षा केली जात आहे.



**चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगनं केली होती धमाकेदार कमाई :** बॉर्डर २ धुरंधर आणि छावा या चित्रपटांपेक्षा चांगली कमाई करेल असं ॲडव्हान्स बुकिंगवरून सिद्ध होतं आहे. या चित्रपटानं ॲडव्हान्स बुकिंगमध्ये ७ कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. आता पहिल्या दिवशी हा चित्रपट ५० कोटींहून अधिक कमाई करेल अशी अपेक्षा केली जात आहे. तसेच या चित्रपटामधील गाणी देखील प्रेक्षकांना खूप आवडली आहेत. सोशल मीडियावर सध्या बॉर्डर २ हा चित्रपट खूप गाजत आहे. अनेकजण या चित्रपटाला पाहण्याची इच्छा व्यक्त करत आहेत. हा चित्रपट प्रजासत्ताक दिवशी देखील रुपेरी पडद्यावर जबरदस्त करेल. देशभक्तीवर आधारित या चित्रपटामध्ये असे काही दृश्य प्रेक्षकांना पाहायला मिळेल, ज्यामुळं लोक भावूक होईल.

**तरण आदर्श यांची पोस्ट :** तसेच चित्रपट तज्ञ तरण आदर्श यांनी सोशल मीडियावर एका पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिलं, शक्ती. देशभक्ती. अभिमान... बॉर्डर २ तुमचे मन अभिमानानं भरून काढते... हा चित्रपट राष्ट्राला तसेच सशस्त्र दलांना सलाम करतो... जोरदार शिफारसित. दिग्दर्शक अनुराग सिंग एक गर्जनशील, भावनिकदृष्ट्या भरलेला युद्ध महाकाव्य सादर करतात, जो मोठ्या प्रमाणात, प्रामाणिकपणा आणि आत्म्यानं उंच उभा आहे, तर कल्ट क्लासिक बॉर्डर २च्या वारशाचा सन्मान करतो. तसेच त्यांनी या चित्रपटाला पाचमधून साडेचार स्टार्स दिले आहेत. याशिवाय तरुण आदर्श यांनी आपल्या पोस्टमध्ये चित्रपटामधील कलाकारांची देखील कौतुक केले आहे. आता त्यांच्या या पोस्टवर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देत आहेत. याशिवाय काहीजण म्हणताना दिसत आहेत, की आम्ही हा चित्रपट पाहायला जाऊ. बॉर्डर २ हा येणाऱ्या दिवसामध्ये खूप कमाई करेल.

## तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी घेतले दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दर्शन घेतले. त्यांच्यासह आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहन हंबर्डे यांनीही दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वारा बोर्डतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# हिंद-दी-चादर समागम कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी भाविकांची अलोट गर्दी

## 'बोले सो निहाल सत श्री अकाल च्या जयघोषात लाखो भाविकांनी घेतले दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांसह लाखो भाविकांनी ''वाहे गुरु'' व ''बोले सो निहाल सत श्री अकाल'' च्या जयघोषात श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

आज दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

देशातील विविध राज्यातून आलेल्या सर्व धर्मांच्या भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत.





भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे.

भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी भाविकांसाठी लोकसहभागातून चहा, अल्पोपहार, ज्यूस, विविध स्टॉल उभारण्यात आलेले आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश दिला जात आहे.

## सेवा स्टॉल्सना उत्स्फूर्त प्रतिसाद भाविकांनी व्यक्त केले समाधान

**नांदेड/प्रतिनिधी :** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सेवेसाठी सेवा स्टॉल्स उभारण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेडकरांना केले होते. या आवाहनाला नांदेडवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विविध शासकीय कार्यालये, सेवाभावी संस्था, व्यावसायिक आस्थापना, व्यापारी संघटना, बँका, पतसंस्था, शिक्षण संस्था, उत्पादक, उद्योजक तसेच लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेत सेवा स्टॉल्ससाठी नोंदणी केली. समागम परिसराच्या चहूबाजूंनी निःशुल्क सेवा स्टॉल्स उभारण्यात आले होते.

या स्टॉल्सवर चहा, बिस्किटे, नाश्ता, फलाहार, पाणी, सरबत, आईस्क्रीम, लस्सी, चिक्की, उसाचा रस आदी विविध पदार्थांची दिवसभर रेलचेल पाहायला मिळाली. बीएसएनएलच्या वतीने मोफत सिमकार्डचे वितरण करण्यात आले. तसेच आरोग्य तपासणी व औषध वाटप उपक्रमाचाही हजारो भाविकांनी लाभ घेतला.

याशिवाय मेंदूची व्यायामशाळा, पर्यटन विकास, विमान उड्डाण क्षेत्रातील रोजगार संधी, कृषी व पोस्ट विभागाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आबालवृद्धांसह दूरवरून आलेल्या भाविकांनी या सेवा उपक्रमांचा लाभ घेतला.

सेवा स्टॉल्सच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निःशुल्क सेवांबाबत बहुसंख्य भाविकांनी समाधान व्यक्त केले. सर्व स्टॉलधारकांनी दोन्ही दिवस योग्य नियोजन करून उत्कृष्ट सेवा बजावली असून ही सेवा निश्चितच प्रशंसनीय असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

या सेवा उपक्रमांमुळे नांदेडकरांचा सेवाभाव भाविकांच्या मनात कायम राहील. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली स्टॉल व्यवस्थापन पथकाने स्टॉल नियोजन, वितरण व संचालनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## मुंबईत रेल्वे स्टेशनवर प्राध्यापकाची चाकू भोसकून हत्या

**मुंबई/प्रतिनिधी :** पश्चिम रेल्वे मार्गावर मालाड स्टेशनवर शनिवारी रात्री ३१ वर्षांच्या प्राध्यापक आलोक सिंह यांची चाकू भोसकून हत्या करण्यात आली. ही घटना मालाड स्टेशनच्या प्लॅटफफॉर्म क्रमांक एकवर घडली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपी ओंकार शिंदे (२७) याला अटक केली आहे.

ट्रेनमधून उतरताना धक्का लागल्यावरुन वाद झाला आणि ओंकारने प्राध्यापक आलोक सिंह यांची चाकू भोसकून हत्या केली. पोलिसांनी प्राध्यापकाच्या हत्येप्रकरणी सीसीटीव्ही फूटेजच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला आणि त्याला अटक केली. सध्या आरोपीची बोरिवली पोलीस ठाण्यात चौकशी सुरू आहे.

हत्या केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरुन पळून गेला होता. पोलिसांनी आरोपीला वसई स्टेशनवरुन अटक केली. फक्त ट्रेनमधून उतरताना धक्का लागला म्हणून ओंकारने हत्या केली की या हत्येमागे वेगळे कारण आहे याचा तपास पोलीस करत आहेत. प्राध्यापकाच्या हत्येप्रकरणी आरोपी विरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

कोण होते प्राध्यापक आलोक सिंह ?

नरसी मोनजी कॉलेज, विलेपार्ले येथे २०२४ पासून कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते. स्वभावाने शांत, दयाळू आणि सभ्य होते.वाद करणे, म्हणणे पटवून देण्यासाठी युक्तिवाद करत बसणे असा आलोक यांचा स्वभाव नव्हता. ते साधे होते आणि कोणावरही कधी संतापत नव्हते; अशी माहिती त्यांना ओळखणाऱ्यांनी दिली आहे.

आलोक सिंह शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी रात्री विलेपार्ले स्टेशनवरुन बोरिवलीला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसले. मालाड स्टेशनवर आलोक यांची हत्या झाली.

आलोक यांचे काकाही प्राध्यापक होते. जेम तेम दोन वर्षांपूर्वी आलोक यांचे लग्न झाले होते. पण शनिवारी घडलेल्या घटनेमुळे आलोक यांच्या

## बाहेर हसू, मनात वादळ, सलमान खानच्या भावाचा घटस्फोट

**मुंबई/प्रतिनिधी :**बॉलिवूडचा भाईजान सलमान खान आणि त्याचे तिन्ही भाऊ कायम चर्चेत असतात. सलमान खान अविवाहित आहे. दरम्यान, दोन्ही भावांचा घटस्फोट झाला आहे. सलमान खानचा भाऊ सोहेल खान आणि सीमा सजदेह यांचा २०२२मध्ये घटस्फोट झाला होता. दरम्यान, अलिकडेच सीमा सजदेहने सोहेलसोबत विभक्त होण्यामागचं कारण आणि घटस्फोटानंतर जीवन कसे बदलले, हे उघड केले आहे. सीमा सजदेहने वय, वेळ आणि दुरावा यामुळे त्यांच्या नात्यात कसे अंतर वाढू लागले? याबाबत सांगितले. दोघांचे लग्न अगदी कमी वयात झाले, मात्र, लोक काळाबरोबर कसे बदलतात, याबाबत तिनं सांगितले. दोघांमधील घटस्फोट घेण्यामागचं कारण काय? तिनं याबाबत खुलासा केला आहे.

सोहेल खान आणि सीमा सजदेह यांनी १९९८ साली लग्नगाठ बांधली. त्यानंतर २०२२ साली काडीमोड घेतला. सध्या ते निर्वाण आणि योहान या दोन मुलांचे पालक आहेत. घटस्फोटाबाबत सीमा म्हणाली, ''आम्ही जेव्हा लग्न केले. तेव्हा आम्ही खूप लहान होतो. मी २२ वर्षांची होते. आम्ही एकत्र वाढलो. तसतसे आम्ही वेगवेगळ्या दिशेनं जाऊ लागलो. आमचे दृष्टिकोन बदलले. अखेर आम्हाला जाणवलं की, आम्ही पती पत्नीपेक्षा चांगले मित्र आहोत'', असं सीमा म्हणाली.

## हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमात भाविकांची मोफत एण्डोस्कोपी तपासणी




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त येथील मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमाला येणाऱ्या भाविकांना गॅलक्सी हेल्थ केअर चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने एण्डोस्कोपी चाचणीची सुविधा पुरविण्यात आली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पहिले व एकमेव फिरते एण्डोस्कोपी रुग्णालय असलेल्या गॅलक्सी हेल्थ केअर चॅरिटेबल ट्रस्टमार्फत सलग दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात आला. या दोन दिवसांत मोफत तपासणी व उपचार करत सेवाभाव जपला.

डॉ. नितीन जोशी यांनी सेवाभावी वृत्ती जोपासत हा उपक्रम सुरू केला असून, ग्रामीण भागातील रुग्णांना शहरात येऊन महागड्या तपासण्या करणे शक्य नसल्याने अशा गरजू रुग्णांसाठी ही सेवा सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या संस्थेची स्थापना चार वर्षांपूर्वी झाली असून, संस्थेचा चौथा वर्धापन दिन उद्या दि. २६ जानेवारी रोजी साजरा होत आहे. मागील चार वर्षांत संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ११८ शिबिरे आयोजित करण्यात आली असून, १५०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले आहेत.

तरुण वयात पचन संस्थेच्या गंभीर आजारांमुळे व उशिरा होणाऱ्या निदानामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करणे, तसेच सामाजिक बांधिलकीतून जनसामान्यांचे जीवनमान उंचावणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे डॉ. जोशी यांनी स्पष्ट केले. पचन संस्थेतील जखमा व गाठींचे निदान बहुतांश वेळा शेवटच्या टप्प्यात होत असल्याने, प्राथमिक अवस्थेतच एण्डोस्कोपीद्वारे लवकर निदान व्हावे, यासाठी हा उपक्रम राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये डॉक्टरांची तपासणी फी, रक्त तपासणी तसेच तोंडाद्वारे एण्डोस्कोपी या सर्व सेवा पूर्णपणे मोफत देण्यात येत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रमासाठी नांदेड येथे आगमन




दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहीब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज मुंबई येथून विमानाने नांदेड येथील श्री गुरु गोबिंद सिंघ जी विमानतळावर आगमन झाले.मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांचे आगमन होताच विमानतळ परिसरात त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आगमन प्रसंगी पालकमंत्री श्री.अतुल सावे,खासदार अशोक चव्हाण,खासदार डॉ.भागवत कराड,खासदार डॉ.अजित गोपछडे, आमदार तुषार राठोड,राजेश पवार, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर,नांदेड परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप,जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली,पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार तसेच महानगरपालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पर्यावरण मंत्री श्रीमती. पंकजा मुंडे व आमदार रवींद्र चव्हाण यांचेही नांदेड येथे आगमन झाले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे विमानतळावरून गुरुद्वारा व मोदी मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या ''हिंद दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्तच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी रवाना झाले.

## शब्दकोडे क्र. 70



आडवे शब्द

१. सर्वश्रेष्ठ धर्म ४. या दगडाला मलमलीची उपमा दिली जाते ८. बाराखडीच्या पुस्ताकातच भेटणारा प्राणी १०. सम १२. पाण्याचे हवेत रूपांतर १५. भांडवलशाहीतील प्रमुख घटक १८. जयपराजय १९. डोंगरावरून सतत पडणारा पाण्याचा प्रवाह २०. मान्यतापत्र, अधिकारपत्र २१. पूर्णपणे २३. जळलेले पीक २४. बुजरा २६. दिशादर्शक यंत्र २७. सतत नकार ऐकवणारे वाद्य ३०. कणीदार ३१. पहिला ऋतू ३२. सकस, सत्वयुक्त ३४. जोधळ्याची एक जात ३६. हिंदीतील पण ३८. व्यवस्थित ३९. शिक्षक ४०. दृश्य ४१. दात असताना दुर्मिळ असणारे धान्य ४२. ओशाळलेला ४३. पाणी ४४. एखाद्याची कड घेणे ४५. ताक ४६. सैन्यातील शिपाई ४७. याने कांदे सोलता येतात? ४८. संपूर्ण ४९. साधना ५०. इतर, दुसरे ५१. साठ मिनिटे ५३. संकट आणणारे शस्त्र ५४. आमंत्रक ५५. उत्कर्ष, प्रगती ५७. संध्याकाळ ५९. बाजेची कापडी पट्टी ६२. तृण ६३. निरुपयोगी लोकांची भरती ६५. मौज ६७. आदिमाया ६८. नुकतेच सरलेले दिवस ६९. जेमतेम, मोठ्या मुश्किलीने ७१. निस्तरता न येणारी साडी किंवा भानगड ७२. पद्धत

उभे शब्द

१. तप्त होणारा डोक्याचा भाग २. व्रत ३. भांबावलेला ५. गणपती ६. होकार, संमती ७. रत्नांची माळ ८. मिळून येणे ९. लबाडीचा हेतू ११. हा प्राणी रामायणकाळातही होता म्हणतात १३. न जाणो याच्या उच्चाराने ब्रह्महत्या व्हायची! १४. आकाश १६. विशेष १७. 'नकोसा' नवरा १९. धमकी, तंबी २१. मर्यादा २२. संध्याकाळ २५. सुकामेव्यातील एक फळ २७. लीन २८. अर्धा 'र' २९. एक क्षार ३३. नारळाचे झाड ३४. संकट दूर करणारा ३५. आश्वासन ३७. मगज ३८. कोथिंबीरीचे बी ३९. कैफी, नशा अणणारा ४०. मंदिर ४१. चाक ४२. साडेसातीचा ग्रह ४३. द्वाड, खोडकर ४४. कित्येक ४५. सूर्य ४६. युद्धजन्य स्थितीत मोठ्या प्रमाणावर राबवली जाणारी लष्करी मोहीम ४८. सोददित ४९. तमाशातील कलाकार ५१. चांदणी ५२. सटवाई ५३. हत्तीची चाल ५६. पुष्कळ ५८. गतकाल ५९. आकाश ६०. माळकरी ६१. रबरी चपला ६३. झोपडी ६४. पाठवलेला ६६. झाडाझडती ७०. मलई

### शब्दकोडे क्र. 69 चे उत्तर

आडवे उत्तर

१.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर

१.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

# शहराची हद्दवाढ लवकरच; उच्च न्यायालयाचे राज्य शासनाला चार महिन्यांत निर्णयाचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणारी नगरपरिषद हद्दवाढ लवकरच प्रत्यक्षात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. संजय गायकवाड यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य शासनाला चार महिन्यांच्या आत हद्दवाढ प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

बुलढाणा नगरपरिषद हद्दीत शहराचा विस्तार झपाट्याने होत असून, शहरालगतची सावळा, सुंदरखेड, येळगाव सागवन व जांभरून ही गावे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. या ग्रामपंचायतींमधील नागरिकांना पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आदी मूलभूत नागरी सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने त्यांना बुलढाणा नगरपरिषदेच्या सुविधांवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी नगरपरिषदेवर अतिरिक्त ताण निर्माण होत असून, नियोजनबद्ध विकासासाठी हद्दवाढ करणे अपरिहार्य बनले होते.

याच पार्श्वभूमीवर आ. संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बुलढाणा नगरपरिषदेने २४ मार्च २०२१ रोजी हद्दवाढीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. मात्र, अनेक वर्षे लोटूनही या प्रस्तावावर कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता व तो प्रलंबित ठेवण्यात आला होता.

शहराच्या भविष्यातील विकासात होणारा विलंब लक्षात घेऊन आ. संजय गायकवाड यांनी स्वतः पुढाकार घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्रमांक ४७८९/२०२५ दाखल केली. या याचिकेवर सविस्तर सुनावणी झाल्यानंतर दि. १९ जानेवारी रोजी न्यायालयाने आ. संजय गायकवाड विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणात आदेश पारित करत राज्य शासनाला चार महिन्यांच्या आत बुलढाणा नगरपरिषदेच्या हद्दवाढ प्रस्तावावर निर्णय घेण्याचे बंधनकारक निर्देश दिले. या ऐतिहासिक निर्णयामुळे बुलढाणा



शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, शहरालगतच्या ग्रामपंचायतींना नागरी सुविधांचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे. पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, आरोग्य सेवा, शैक्षणिक सुविधा, प्रकाश व्यवस्था यासारख्या मूलभूत सोयीसुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार असल्याने हजारो नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जिल्ह्यात ८ हजारचे वर सौर कृषी पंप

## महावितरणची जनजागृती प्रभावी.. जिल्ह्यातील शेतकरी होणार समृद्ध ..



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या सौर कृषी पंप योजनेचा बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अपार लाभ होत आहे.. या योजनेमुळे मुख्यतः दिवसभर विश्वसनीय वीज पुरवठा मिळतो, ज्यामुळे सिंचन सुलभ होते आणि उत्पादन वाढते... विजेच्या खर्चापासून पूर्ण मुक्ती मिळते, कारण सौर ऊर्जा मोफत पंपाची उभारणी शासकीय अनुदानाने स्वस्त होते, तर देखभाल खर्च सुद्धा कमी लागतो .. पर्यावरणस्नेही योजना असल्याने कार्बन उत्सर्जन कमी होऊन शेती शाश्वत होते.. शेतकऱ्यांना आर्थिक बचत तर होतेचेच, शिवाय पाणी बचत आणि ऊर्जा स्वावलंबन मिळते.. त्यामुळे जिल्ह्यातील महावितरणच्या जनजागृतीमुळे शेतकऱ्यांनी अंदाजे ८००० सौर पंप उभारले गेले आहे .. याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि जीवनमानात दिसतोय.. ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे..

# मलबार गोल्ड अँड डायमंड कंपनीला लाखोंचा चुना, सोन्याची नाणी संशयास्पदरित्या गायब

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील नामांकित मलबार गोल्ड अँड डायमंड कंपनीकडून नाशिकमधील एका खासगी कुरिअर कार्यालयाकडे पाठवण्यात आलेली तब्बल ९ लाख ८७ हजार १३० रुपये किमतीची सहा सोन्याची नाणी (गोल्ड कॉइन्स) संशयास्पदरित्या गायब झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, ही नाणी नेमकी कुणी, कशासाठी आणि कोणत्या उद्देशाने ऑर्डर केली, याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नसल्याने हा संपूर्ण व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

मलबार गोल्ड अँड डायमंड कंपनीने याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, १६ जानेवारी रोजी दुपारी १२ ते १ या वेळेत मलबार गोल्डच्या नावाने एका संकेतस्थळावरून नाशिकमधील खासगी कुरिअर कार्यालयाकडे सहा वेगवेगळ्या नावांनी सहा सोन्याच्या नाण्यांची ऑर्डर देण्यात आली होती. प्रत्येक शिपमेंटमध्ये 'गोल्ड कॉइन' असल्याचे नमूद करण्यात आले होते आणि प्रत्येक पार्सलसाठी वेगवेगळे ट्रॅकिंग नंबर वापरण्यात आले होते.

या ऑर्डरसाठी 'राज पटेल', 'सलोनी चव्हाण', 'नितीन कोकणी' आणि 'अवतल असे' अशी वेगवेगळी नावे वापरण्यात आली होती. विशेष म्हणजे, सर्व ऑर्डरसाठी ९३७६६७८७०५ आणि ९६४९४५२६७० हे दोन मोबाईल क्रमांक नोंदवण्यात आले होते. डिलिव्हरीच्या वेळी संपर्कासाठी पुन्हा ९७८५९६०६८८ आणि ८२३९८४७२५८ हे दोन अनोळखी मोबाईल क्रमांक वापरण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे ऑर्डर देणारे आणि डिलिव्हरीसाठी संपर्क करणारे व्यक्ती वेगळे असल्याचा संशय अधिक बळावला आहे.

# हिंद दी चादर कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी भाविकांना लंगर वाढून केली सेवा



**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी प्रत्यक्ष लंगर वाढून भाविकांची सेवा केली.

जिल्हाधिकारी यांनी रांगेत बसलेल्या भाविकांना लंगर सेवा केल्याने उपस्थितांमध्ये विशेष उत्साह व समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

सेवा, समता व बंधुभावाचा संदेश देणाऱ्या लंगर परंपरेचे महत्त्व यावेळी अधोरेखित झाले. जिल्हाधिकारी यांनी लंगर सेवेत सहभागी होत शीख परंपरेतील सेवाभाव, मानवता व समतेच्या मूल्यांना अभिवादन केले.ही लंगर सेवा २४ तास भाविकांच्या सेवेसाठी खुली आहे.

शहीदी समागमाच्या निमित्ताने नांदेड येथे देश-विदेशातून भाविक उपस्थित असून, संपूर्ण परिसर भक्तिमय व सेवाभावी वातावरणाने भारावून गेला आहे. या कार्यक्रमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचा जागर करण्यात येत आहे.

# पुणे महापालिकेत शून्य जागा, दारूण पराभव झालेल्या मनसेत मोठी उलथापालथ होणार; राज ठाकरे भाकरी फिरवणार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे महापालिका निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. एकेकाळी पुणे महापालिकेत तब्बल २९ नगरसेवकांचा दबदबा असलेल्या मनसेला यंदाच्या निवडणुकीत एकही नगरसेवक निवडून आणता न आल्याने पक्षात आत्मचिंतन सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील मनसे शहर कार्यकारणीत मोठे बदल होण्याचे स्पष्ट संकेत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिले आहेत.

मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी प्रतिक्रिया देताना, ''निवडणुकांमध्ये जय-पराजय होत असतात. यंदा पुणे महापालिका निवडणुकीत आम्ही पहिल्यांदाच शिवसेनेसोबत युती करून मैदानात उतरलो होतो. निकाल आमच्या अपेक्षेप्रमाणे लागले नाहीत. हा पराभव आम्ही मान्य केला असून लवकरच याबाबत पक्षांतर्गत आत्म चिंतन करण्यात येईल,'' असे स्पष्ट केले.

निवडणूक प्रचाराबाबतही पक्षाकडून स्पष्ट कबुली देण्यात आली आहे. ''या निवडणुकीत प्रचाराची रणनीती आखताना आम्ही काही ठिकाणी कमी पडलो. ही निवडणूक एकप्रकारे धनशक्ती विरुद्ध संघटनशक्ती अशी होती. मात्र, याचा अर्थ असा नाही की आम्ही जबाबदारी झटकतो,'' असे सांगत संभूस यांनी येत्या काळात पुण्यात मनसेच्या कामकाजात बदल दिसतील, असा दावा केला.

महत्त्वाचं म्हणजे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे लवकरच पुण्यात येऊन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेणार असल्याची माहितीही हेमंत संभूस यांनी दिली. ''राज साहेब आणि शर्मिला वहिनी यांच्याशी चर्चा झाल्यानंतर पुणे शहरात स्पष्ट बदल दिसतील. संघटनात्मक पातळीवर निर्णय घेतले जातील,'' असे ते म्हणाले. पुणे मनसेच्या शहराध्यक्षपदाबाबत विचारले असता, ''फक्त शहराध्यक्षपदाबाबत विचारू नका. येत्या काळात पक्षात अनेक बदल झालेले दिसतील,'' असे सूचक विधान संभूस यांनी केले. त्यामुळे केवळ शहराध्यक्ष नव्हे, तर संपूर्ण शहर कार्यकारणीमध्ये फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुलढाण्यात सायकल रॅलीद्वारे मतदार जनजागृती









दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसीलदार विठ्ठल कुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फिट इंडिया उपक्रमांतर्गत बुलढाणा सायकलिंग क्लबच्या वतीने ३० किलोमीटरची सायकल रॅली बुलढाण्यात आयोजित करण्यात आली.

या सायकल रॅलीच्या माध्यमातून नागरिकांनी स्वयंप्रेरणेने मतदार म्हणून नाव नोंदणी करावी तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी व्यापक जनजागृती करण्यात आली. या रॅलीला सायकलप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून बहुसंख्येने सायकलस्वार सहभागी झाले होते.

या सायकल रॅलीत नायब तहसीलदार संजय बनगाळे, बुलढाणा सायकलिंग क्लबचे अध्यक्ष दीपक क्यावल, सरदार सिंग ठाकूर, नितीन देशमुख, संतोष सानप (देऊळगाव मही), विद्या सानप (देऊळगाव मही),जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. अनिता राठोड तसेच लेखा अधिकारी विष्णू गाडे हे सहभागी झाले होते.

सायकल रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व सायकलस्वारांना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी सहभागी सर्वांना उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## वृत्तविशेष...

### पालकमंत्री अतुल सावे यांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे घेतले दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात आज पालकमंत्री अतुल सावे यांनी श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, राज्य समागम समितीचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक आदी उपस्थित होते.

### पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा चरणी नतमस्तक

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास (दि. २४) पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी नांदेड येथे हजेरी लावली. त्यांनी ऐतिहासिक तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे अत्यंत श्रद्धाभावाने दर्शन घेतले. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दुपारी सचखंड गुरुद्वारा येथे पोहोचले. गुरुद्वारा परिसरात प्रवेश करताच त्यांनी बोले सो निहालच्या जयघोषात पवित्र गुरु ग्रंथ साहिबजी समोर माथा टेकला आणि आशीर्वाद घेतले. यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ (से.नि.भाप्रसे) यांची उपस्थिती होती.

### जलसंपदा मंत्री गिरीश महाजन तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वाराचे घेतले दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास (दि. २४) जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तखत सचखंड श्री हजूर अबचल नगर साहिब जी गुरुद्वारा येथे दर्शन घेतले. पवित्र गुरु ग्रंथ साहिबजी समोर माथा टेकला आणि आशीर्वाद घेतले.

### आंध्रप्रदेशाचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण यांचे नांदेड विमानतळ येथे आगमन



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आंध्रप्रदेशाचे उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण यांचे आज २५ जानेवारी रोजी नांदेड येथील गुरु गोविंद सिंघ जी विमानतळावर आगमन झाले. उपमुख्यमंत्री श्री.कल्याण यांचे स्वागत खासदार अशोक चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

उपमुख्यमंत्री श्री.कल्याण हे विमानतळ येथून शासकीय वाहनाने गुरुद्वारा व मोदी मैदान येथे आयोजित '' हिंद दी चादर ''श्री गुरु तेग बहादुर साहीब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी विमानतळ येथून रवाना झाले.

मुंबईत दिंडोशी मनपा वसाहतीत दूषित आणि पिवळसर पाण्याचा पुरवठा

मुंबई २५ जानेवारी (पीएसआय)

मुंबई महानगरपालिकेच्या 'पी पूर्व' विभागांतर्गत येणाऱ्या गोरेगाव (पूर्व) येथील दिंडोशी मनपा वसाहत परिसरात गेल्या काही दिवसांपासून अत्यंत दूषित आणि पिवळसर रंगाचा पाणीपुरवठा होत आहे. यामुळे स्थानिक रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून, नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

पिण्याच्या पाण्यात गटाराचे पाणी ?

दिंडोशी मनपा वसाहतीतील रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी नळाला येणारे पाणी अत्यंत गढूळ आणि पिवळसर रंगाचे असते. पाण्याला उग्र वास येत असून, हे पाणी पिण्यासाठी तर सोडाच, पण दैनंदिन वापरासाठीही अयोग्य असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. जलवाहिनीमध्ये गटाराचे पाणी मिसळले जात असल्याची शक्यता स्थानिकांनी वर्तवली आहे.

नागरिकांमध्ये भीती आणि संताप

दूषित पाण्यामुळे परिसरात काविळ, टायफॉइड आणि जुलाबासारखे जलजन्य आजार पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषत: लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत मोठी चिंता व्यक्त केली जात आहे. ''आम्ही नियमित पाणीपट्टी भरतो, तरीही आम्हाला विषारी पाणी का?'' असा संतप्त सवाल येथील गृहिणी आणि नागरिक विचारत आहेत.

प्रशासनाकडे मागणी

'पी पूर्व' विभाग कार्यालयाने तातडीने जलवाहिन्यांची तपासणी करावी, गळती दुरुस्त करावी आणि परिसरात शुद्ध